# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर, यांचे कार्यालय,

**ई-मेल- chandrapur.rdc@ gmail.com        दुरध्वनी क्रमांक- 07172-250659**

**क्रमांक. एमएजी/कार्या-8/टे-1/2018/451                दिनांक:- 29 / 11 /2018**

## जाहीर सुचना

शासनाच्या आदेशाप्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 25(3) अन्वये चंद्रपूर जिल्हयातील ज्या न्यायालयात नियमित सहाय्यक सरकारी अभियोक्त्याची नेमणूक झाली नाही अशा न्यायालयातील फौजदारी प्रकरणे चालविण्याकरीता **15** विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्याचे पॅनल तयार करावयाचे आहे. त्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **विवरण** | **कालावधी** |
|---|---|---|
| 1 | अर्ज स्विकारण्याची तारीख | 30.11.2018 ते 15.12.2018 |
| 2 | पात्र उमेदवारांची यादी https://chanda.nic.in & chanda.nic.in या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | 20.12.2018 |
| 3 | दस्ताऐवज पडताळणी | अंदाजे 27/12/2018 व 28/12/2018 ला सकाळी 10.00 ते 11.00 वाजेपर्यत |
| 4 | मुलाखत दिनांक व वेळ | अंदाजे 27/12/2018 व 28/12/2018 ला सकाळी 11.30 वाजता |
| 5 | अंतीम यादी | दिनांक 2.01.2019 |

तरी इच्छुक वकीलानी खाली दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणे दिनांक 15 /12/2018 पर्यत अर्ज दिलेल्या नमुन्यात परीपूर्ण भरुन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय चंद्रपूर येथे **कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) अर्ज नमुना स्वत:चा अचूक पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक व वैयक्तीक तपशिलासह (बायोडाटा) दस्ताऐवजांचे छांयाकीत प्रतीसह सादर करावेत.**

**उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

**अटी व शर्ती**

1. उमेदवार वकील संघाचा सदस्य असावा.
2. सर्व साधारण उमेदवाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 38 वर्षापेक्षा जास्त नसावे. व मागासवर्गीयांसाठी 43 वर्षापेक्षा जास्त नसावे.
3. सध्या कार्यरत विशेष सहाययक सरकारी अभियोक्ता यांना शासनाच्या दिनांक 08 /09/ 2015 रोजीच्या सुचनेनुसार उच्च वयोमर्यादेत 45 वर्षा व्यतिरीक्त अन्य कोणतीही सुट नाही. उपरोक्त पदांवरील नियुक्तीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांची सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. **अर्जाचा नमुना https://chanda.nic.in & chanda.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

4. उमेदवारास कमीत कमी 5 वर्षे फौजदारी प्रकरणे चालविण्याचा अनुभव असावा. व अनुभवाबाबतचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे. तसेच अर्जासोबत आवश्यक कागदपत्राची यादीनुसार छायांकीत प्रती सादर करावे. 1) मराठी/ इंग्रजी/हिंदी भाषेचे ज्ञान असल्याबाबत प्रमाणपत्र 2) बार कॉन्सील नोंदणीचे प्रमाणपत्र 3) बार असोसियनचे नोंदणी प्रमाणपत्र 4) कायदयाची पदवी 5) जात प्रमाणपत्र.
5. उमेदवारावर कोणत्याही प्रकारची फौजदारी स्वरुपाची केस प्रलंबित नसावी. किंवा त्यास शिक्षा झालेली नसावी.
6. प्रतिक्षा यादीत निवड झालेल्या उमेदवारास जेव्हा मा. सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, यांचे कडे काम असेल तेव्हाच काम देण्यात येईल.
7. प्रतिक्षा यादीत निवड झालेल्या उमेदवारास शासनाविरुध्द कोणत्याही न्यायालयात फौजदारी स्वरुपाचे काम करता येणार नाही.
8. प्रतिक्षा यादीत निवड झालेल्या उमेदवारास मा. सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, यांनी न्यायालयात काम दिल्यास गृहविभाग महाराष्ट्र राज्य यांनी वेळोवेळी सूचीत केलेल्या मापदंडाप्रमाणे मानधन देण्यात येईल.
9. उमेदवाराने अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास त्यांचा अर्ज नामंजूर करण्यात येईल.
10. उमेदवारांच्या मुलाखतीमध्ये न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात चालणा-या सर्व प्रकरणांच्या कायद्याविषयी फौजदारी प्रक्रिया संहिता, सर्व विशेष कायदे व वेळोवेळी कायद्यामध्ये झालेल्या सुधारणा व न्यायनिवाडा याबाबत उमेदवाराची मौखिक चाचणी घेण्यात येईल.
11. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता, यांचे पद मानधनानुसार असून पुर्णत: अस्थाई स्वरुपाचे आहे. त्यांना शासकीय पदाचे कोणतेही लाभ अथवा फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.
12. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून शासनाचा पुर्णवेळ सेवक नियुक्ती नसलेले कितीही वर्षे काम पाहिले तरी त्यांना नियमीत सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदावर हक्क सांगता येणार नाही.
13. जिल्हयाचे सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता हे पर्यवेक्षी व नियंत्रण अधिकारी असल्याने त्यांच्या सूचनेचे व आदेशाचे पालन करणे बंधनकारक असेल.
14. विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता याची कंत्राटी पध्दतीनुसार मानधनावर निवड करण्यात येत असून निवड झालेले विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना नियमीत शासकीय पदावर हक्क बजावता येणार नाही. व त्याबाबत कोठेही दाद मागता येणार नाही. दाद मागितल्यास पॅनलवरुन कमी करण्यात येईल.

**जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर**

**प्रतिलीपी:**

1. अधिक्षक, जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. सोबत संलग्न केलेली जाहीर सूचना कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करुन या कार्यालयास प्रसिध्दी अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा.
2. अधिक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय/ तालुका -------------- यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. सोबत संलग्न केलेली जाहीर सूचना कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करुन या कार्यालयास प्रसिध्दी अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा.
3. उपविभागीय अधिकारी, ----------------------- (सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. सोबत संलग्न केलेली जाहीर सूचना कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करुन या कार्यालयास प्रसिध्दी अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा.
4. तहसिलदार ----------------------- (सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. सोबत संलग्न केलेली जाहीर सूचना कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करुन या कार्यालयास प्रसिध्दी अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा.
5. अध्यक्ष / सचिव चंद्रपूर बार असोसिएशन चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. त्यांना विनंती करण्यात येते की सदर जाहिर सूचना बार काऊंसीलच्या सूचना फलकावर प्रसिध्द करुन सर्व सदस्यांना अवगत करावे. व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास तात्काळ पाठविण्यात यावा.
6. अध्यक्ष / सचिव तालुका बार असोसिएशन ---------------------------- जि.चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित. त्यांना विनंती करण्यात येते की सदर जाहिर सूचना बार काऊंसीलच्या सूचना फलकावर प्रसिध्द करुन सर्व सदस्यांना अवगत करावे. व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास तात्काळ पाठविण्यात यावा.
7. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, (NIC) जिल्हा कार्यालय चंद्रपूर, यांनी सदर जाहिर सुचना आणि अर्जाचा नमुना **chanda.nic.in** & **https://chanda.nic.in** या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावा. तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
8. जिल्हा नाझर जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर वरील सुचना जिल्हाधिकारी कार्यालय नोटिस बोर्डावर लावून प्रसिध्द करावी. व अहवाल सादर करावा.

**जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर**

# Application Form

**( Proforma of the Application for the appointment of Special Assistant Pubic Prosecutor)**

Photograph

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | Post Applied for | | | |
| 2. | Category (ST/VJ NT-A/NT-D/SBC/OBC/OPEN) | | | |
| 3. | Full Name Of Applicant, Surname first (In Block Capital Letters) | | | |
| 4. | Father's/Husband's Name : | | | |
| | Residential address :- | | | |
| | Permanent Address :- | | Temporary Address :- | |
| | Room/ Flat/ Bidg No : | | Room/ Flat/ Bidg No : | |
| | Village/Post : | | Village/Post : | |
| | Taluka : | | Taluka : | |
| | District : | | District : | |
| | State : | | State : | |
| | Pin : | | Pin : | |
| | Phone No (o) - | | Phone No (o) - | |
| | (R) - | | (R) - | |
| | Mobail No. - | | Mobail No. - | |
| 5. | (a) Date of birth (DD/MM/YY) : | | | |
| | (b) Age on the date of Application (DD/MM/YY) : | | | |
| 6. | Place of Birth : | | | |
| 7. | Whether Candidate is Domicile in the State of Maharashtra : | | | |
| 8. | Educational Qualifications (details of the examination from S S C / H S C/ Degree) | | | |

| Name of the Examination | Name of Board University | Subjects | Class | Year of passing |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

| | |
|---|---|
| 9. | a) Total number of years of practice :- |

| Name of the courts where practised | Total no. Of Criminal matters conducted |
|---|---|
| | |

| | | |
|---|---|---|
| 10. | Languages Known : | |
| | (Read--------------------------------------------------------------------) | |
| | (Write -----------------------------------------------------------------) | |
| | (Speak------------------------------------------------------------------) | |
| 11. | Have you ever been arrested/ detained/prosecutedbound/down/convicted/ facing any criminal prosecution by/in aCourt of Law for any offence if yes, give details there of:- | |
| 12. | Whether you are facing /have ever faced any disciplinary action from the Bar Council of India or Bar Council of Maharashtra and Goa or any Bar Association or any other professional body. | |
| 13. | **:- DECLARATION -:** | |

I---------------------------------------------------------------------------do hearby state that, I have not been convicted of an offence involving moral turpitude. whatever is started herein above is true and corret to the best of my knowledge and belief and if any information is found to be false and incorrect, my appointment as Speacial Assistant Public Prosecutor, if made shall stand automatically cancelled and I shall be liable for futher necessary action.

Date:-

Place:- **Signeture of Applicant**

N.B : -

1. Candidate shall append the required true copies of testimonials certificates and documents, duly attested by the Gazetted Officer.
2. Canvassing in any for shall disqualify the application.
3. The Applicant shall produce the Character Certificate from any two Senior Advocates/Senior Counsels.
4. The Applicant shall affix his recent passport size photograph with his signature.
5. Unsigned applications and applications not properly filled up by the candidates and application without necessary enclosures are liable to be rejected summarily.